# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक २५६०११६०
२५६०११५३
२५६९७३४१

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६९७३४१

गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ : रासेयो/ 903 /२०१२ दि. ५ जून २०१२

**प्रति**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा**

**विषय : 'पुणे ते पंढरपूर हरितऊर्जा दिंडी' साठी स्वयंसेवक पाठविणेबाबत...**

**महोदय,**

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने समर्थ भारत अभियानअंतर्गत बुधवार दि. १३ जून २०१२ ते ३० जून, २०१२ दरम्यान **'राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर हरितउर्जा दिंडी'चे** आयोजन करण्यात आले आहे. या हरितऊर्जा दिंडीचा मुख्य उद्देश वृक्षारोपण, बीजारोपण याबरोबरच ऊर्जा बचत, अक्षय प्रकाश योजना, पाणी प्रश्न, स्वच्छता इत्यादी विषयांवर जनजागरण व यातूनच स्वयंसेवक व्यक्तिमत्व विकास करणे हा आहे. या हरितऊर्जा दिंडीमध्ये पुणे विद्यापीठातून १०० स्वयंसेवक व महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून १०० स्वयंसेवक याप्रमाणे एकूण २०० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

**तरी सदर हरितऊर्जा दिंडीसाठी आपल्या महाविद्यालयातील १ स्वयंसेवक व १ स्वयंसेविका याप्रमाणे दोन स्वयंसेवकांना दि. १३ जून, २०१२ रोजी सकाळी १०.०० वाजेर्यत दिंडीसाठी मुक्कामाच्या संपूर्ण तयारीने पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागात पाठवावे ही विनंती.**

सोबत येतांना स्वयंसेवकाने वैद्यकीय प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र, मा.प्राचार्यांचे संमतीपत्र, ओळखपत्र, रोज लागणारे कपडे, पांढरी गांधी टोपी, पंढरपूरी टाळ, रेनकोट टोपीसहित, टॉर्च (सेल सहित), चादर–सतरंजी (हलक्या वजनाचे), कॅनव्हास शूज, धोतर, पायजमा, नेहरु शर्ट (सफेद रंगाचे), ताट, वाटी, ग्लास, चमचा, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व अत्यावश्यक साहित्य सोबत आणावे. **कळावे, धन्यवाद !**

संपर्क : **रासेयो कार्यालय, पुणे विद्यापीठ ०२०–२५६०११५३/टेलीफॅक्स –२५६९७३४१,**

(दिंडीकरीता विद्यार्थीसंख्या मर्यादित असल्याने विद्यार्थ्यांची नावे दि. ११ जून २०१२ पर्यत फॅक्स/मेलद्वारे कळवावीत. त्यानंतर आलेल्या विद्यार्थ्यांना दिडीत सहभागी होता येणार नाही. तसेच कृपया रासेयो कार्यालयास नावे कळविल्याशिवाय विद्यार्थी परस्पर पाठवू नयेत ही विनंती.)

आपले विश्वासू

5/6/12

**कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**संचालक**
**विद्यार्थी कल्याण मंडळ**